B-26/2/2020

तक्रार क्र-६८

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-2 आय/टे-8/कावि- 375,376,377,378/19
दिनांक : २२ /०२/२०२०

002248

प्रति,
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन नियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
302, वेक फिल्ड हाऊस, 3 रा मजला,
ब्रिठानिया रेस्टॉरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट , मुंबई400 001

**विषय :** Complaint regarding destruction of mangroves and encroachment near Gorai Creek, Borivali Mumbai...

**संदर्भ :** १.आपलेकडील दिनांक 20/04/2019 रोजीच्या ई-मेल संदेशान्वये श्रीमती आदिती प्रधान यांची तक्रार.
२. या कार्यालयाकडील समक्रमांकाचे पत्र दिनांक १३/११/२०१९.
३. उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/टे-५/वर्सोवा-कांदळवन/२०१९ दिनांक ३०/१२/२०१९.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 4378
दिनांक- 26/2/2020
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

प्रस्तुत विषयांकित प्रकरणाबाबत आपलेकडील संदर्भ क्र. १ अन्वये श्रीम. आदिती प्रधान यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाला असून मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० आणि १७/०९/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीलप्रमाणे आहे.

Steno.

DCF(M)

VPG 28/2

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्रीम. आदिती प्रधान |
| ०२ | तक्रारीचा विषय | Debris dumping in Lokhandwala Mangroves- A serious threat to biodiversity and the mangroves |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील उदा: स.नं. , गावाचे नाव, तालुका. | मौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील स.नं. १२० अ, न.भू.क्र. १३७४ अ |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | १. श्री. उमेश बिरारी, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगरे<br>२. श्री. सचिन भालेराव, तहसिलदार अंधेरी<br>३. श्री. हेंमत वरळीकर, मंडळ अधिकारी अंधेरी<br>४. श्री. गणेश लोहार, तलाठी वर्सोवा<br>५. श्री. साठे, वनपाल, अंधेरी<br>६. श्री. प्रकाश देवरुखकर, प.भू. वर्सोवा |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | विषयांकित प्रकरणी उक्त नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी पंचनामा केला आहे. मौजे वर्सोवा, ता. अंधेरी |

स.क्र.120 अ या मिळकतीच्या 7/12 उताऱ्यात कब्जेदार सदरी "महाराष्ट्र हौसिंग बोर्ड" यांचे नांव आहे. सदर ठिकाणी लोखंडवाला बँक रोडपासून जाणारा एक कच्चा रस्ता आहे. सदरचा कच्चा रस्ता लोखंडवाला तलाव किंवा गणपती विसर्जन तलावाच्या उत्तर बाजुने पश्चिमेकडे असलेल्या डंपींग ग्राऊंडकडे गेलेला आहे. सदर रस्त्याची लांबी लोखंडवाला बँक रोडपासून डंपिंग ग्राऊंडपर्यंत सुमारे 1 किलोमीटर इतकी आहे. सदर रस्ता कच्च्या स्वरुपाचा, मातीचा असुन रस्त्याच्या दोन्ही बाजूस सलग असे लोखंडी अँगल व जाळीचे कुंपण केलेले आहे. सदर कुंपणाला पिवळा रंग देण्यात आलेला असून सदरचे कुंपण मागील 3 ते 4 महिन्यापूर्वी तयार करण्यात आले आहे. सदर कुंपणाची उंची अंदाजे 8 फुट असुन, कुंपण मजबूत आहे.

सदर रस्ता अंदाजे 15 फुट रुंदीचा असुन कांदळवन क्षेत्रातुन डंपींग ग्राऊंड पर्यंत जाणारा आहे. सदर रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला कुंपणावर बहुतेक ठिकाणी डेब्रीज/घनकचरा टाकलेला असल्याचे दिसून आले आहे. वरील कुंपणाच्या बाहेरील दोन्ही बाजूस लगत कांदळवनाचे क्षेत्र अर्थात खारफुटी किंवा तिवरांची मोठी झाडे उभी आहेत. सदर रस्त्यावर नुकताच काही तासापूर्वी डेब्रीज/घनकचऱ्याचा ट्रक रिकामा केला असावा, अशी परिस्थिती दिसून आली आहे. एंकदरीतच सदर रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला कुंपणावर डेब्रीज टाकणे असेच सुरु राहिल्यास लोखंडी कुंपण गंजून नष्ट होईल आणि लगतच्या कांदळवन क्षेत्रात घनकचरा टाकून कांदळवन नष्ट करण्याचा प्रयत्न संबंधीत समाज कंटकांकडून करण्यात येईल, याची दाट शक्यता आहे.

मौजे वर्सोवा येथील स.क्र. 120 अ, ही मिळकत महाराष्ट्र हौसिंग बोर्ड यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रीज हे कांदळवनाच्या क्षेत्रापासून 50 मीटरच्या आत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्या कडील शासन निर्णय क्रमांक ईएनव्ही-2001/183/प्र.क्र.31/ता.क.1, दि. 25/10/2001 नुसार "कांदळवनाचे (खारफुटी) क्षेत्र अर्थात जमीन ज्या विभागाच्या अखत्यारित आहे, त्या विभागाने त्या क्षेत्रात कांदळवनाची अवैध कटाई/नुकसान झाल्यास संबंधित विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे कारवाई करणे ही त्या विभागाची जवाबदारी राहील." असे नमुद आहे. त्यामुळे आपल्या मालकीच्या जमिनीमध्ये कांदळवनाच्या क्षेत्रापासून 50 मीटर क्षेत्राच्या आत अवैध डेब्रीज टाकणाऱ्या विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर क्षेत्रातील कांदळवनाचा ऱ्हास कोणाकडूनही केला जाणार

| | | |
|---|---|---|
| | | नाही. याची दक्षता घेण्याची देखील आवश्यकता असल्याने या संदर्भात मा. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना आपले स्तरावरुन लिहून जाणेस विनंती आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे.<br>सदर प्रकरणी यापुर्वीच या कार्यालयाकडील दिनांक १९/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना सदर ठिकाणच्या अतिक्रमण आणि कांदळवन ऱ्हासाबाबत कळविलेले आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | - |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | - |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | - |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | - |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ०७ पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

( वंदना मकू )
**अपर चिटणीस, मुंबई उपनगर**

**स्थळ प्रतिवर मा. निवासी उपजिल्हाधिकारी यांची सही असे.**

## उपविभागी[redacted]ी मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्र[redacted]ा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू) ,मुंबई ४०० ०५१ .

Cms/19/39689

क्र.उविअ/टे-५/वर्सोवा-कांदळवन/२०१९

दिनांक :-३०/१२/२०१९

प्रति,

**मा.जिल्हाधिकारी,**

**मुंबई उपनगर जिल्हा**

जिल्हाधिकारी,
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
DEC 2019

विषय :- मौजे वर्सोवा, ता. अंधेरी येथील स.क्र. १२०अ, न.भू.क्र. १३७४ अ या मिळकतीवरील लोखंडवाला कॉम्प्लेक्स परिसरात डंपींगमुळे कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत....

संदर्भ :- आपल्या कडील पत्र क्र. सी/कार्या-२आय/टे-८/कावि-३७५, ३७६, ३७७, ३७८/२०१९, दि.०६/५/२०१९

महोदय,

मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची बैठक दि. ०९/१२/२०१९ रोजी घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये श्रीमती अदिती प्रधान यांनी मौजे वर्सोवा येथील स.क्र. १२० अ, न.भू.क्र. १३७४ अ या मिळकतीवरील लोखंडवाला कॉम्प्लेक्सच्या परिसरात डंपींगमुळे कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणी करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने दि. २१/१२/२०१९ रोजी तहसीलदार अंधेरी, वन विभागाचे वनपाल, परिरक्षक भूमापक, मंडळ अधिकारी, अंधेरी व तलाठी वर्सोवा यांच्या समवेत स्थळपाहणी करण्यात आली आहे. सदर स्थळपाहणीदरम्यान पुढीलप्रमाणे परिस्थिती निदर्शनास आलेली आहे.

मौजे वर्सोवा, ता. अंधेरी स.क्र.१२० अ या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यात कब्जेदार सदरी "महाराष्ट्र हौसिंग बोर्ड" यांचे नांव आहे. सदर ठिकाणी लोखंडवाला बॅक रोडपासून जाणारा एक कच्चा रस्ता आहे. सदरचा कच्चा रस्ता लोखंडवाला तलाव किंवा गणपती विसर्जन तलावाच्या उत्तर बाजुने पश्चिमेकडे असलेल्या डंपींग ग्राऊंडकडे गेलेला आहे. सदर रस्त्याची लांबी लोखंडवाला बॅक रोडपासून डंपिंग ग्राऊंडपर्यंत सुमारे १ किलोमीटर इतकी आहे. सदर रस्ता कच्च्या स्वरुपाचा, मातीचा असुन रस्त्याच्या दोन्ही बाजूस सलग असे लोखंडी अँगल व जाळीचे कुंपण केलेले आहे. सदर कुंपणाला पिवळा रंग देण्यात आलेला असून सदरचे कुंपण मागील ३ ते ४ महिन्यापूर्वी तयार करण्यात आले आहे. सदर कुंपणाची उंची अंदाजे ८ फुट असुन, कुंपण मजबूत आहे.

सदर रस्ता अंदाजे १५ फुट रुंदीचा असुन कांदळवन क्षेत्रातुन डंपींग ग्राऊंड पर्यंत जाणारा आहे. सदर रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला कुंपणावर बहुतेक ठिकाणी डेब्रीज/घनकचरा टाकलेला असल्याचे दिसून आले आहे. वरील कुंपणाच्या बाहेरील दोन्ही बाजूस लगत कांदळवनाचे क्षेत्र अर्थात खारफुटी किंवा तिवरांची मोठी झाडे उभी आहेत. सदर रस्त्यावर नुकताच काही तासापूर्वी डेब्रीज/घनकचऱ्याचा ट्रक रिकामा केला असावा, अशी परिस्थिती दिसून आली आहे. एंकदरीतच



Scanned by CamScanner

सदर रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला कुंपणावर डेब्रीज टाकणे असेच सुरु राहिल्यास लोखंडी कुंपण गंजून नष्ट होईल आणि लगतच्या कांदळवन क्षेत्रात घनकचरा टाकून कांदळवन नष्ट करण्याचा प्रयत्न संबंधीत समाज कंटकांकडून करण्यात येईल, याची दाट शक्यता आहे.

मौजे वर्सोवा येथील स.क्र. १२० अ, ही मिळकत महाराष्ट्र हौसिंग बोर्ड यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाणी टाकण्यात आलेले डेब्रीज हे कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्या कडील शासन निर्णय क्रमांक ईएनव्ही-२००१/१८३/प्र.क्र.३१/ता.क.१, दि. २५/१०/२००१ नुसार "कांदळवनाचे (खारफुटी) क्षेत्र अर्थात जमीन ज्या विभागाच्या अखत्यारित आहे, त्या विभागाने त्या क्षेत्रात कांदळवनाची अवैध कटाई/नुकसान झाल्यास संबंधित विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे कारवाई करणे ही त्या विभागाची जवाबदारी राहील." असे नमुद आहे. त्यामुळे आपल्या मालकीच्या जमिनीमध्ये कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अवैध डेब्रीज टाकणाऱ्या विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर क्षेत्रातील कांदळवनाचा ऱ्हास कोणाकडूनही केला जाणार नाही. याची दक्षता घेण्याची देखील आवश्यकता आहे. त्यामुळे या संदर्भात मा. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे, ही विनंती

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**

Scanned by CamScanner

पंचनामा

स्थळ - वर्सोवा ⑦
दिनांक - २१|१२|२०१९

आम्ही खाली सह्या करणारे पंच प्रत्येक्ष परीस्थिती पाहुन पंचनामा लिहुन देतो की, आज दि. २१|१२|१९ रोजी मा- उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर व तहसीलदार अंधेरी यांनी मौजे वर्सोवा येथील लोखंडवाला कॉम्पलेक्स समोरील सर्वे नं. १२० अ व न. भू. क्र. १३७४अ मधील कांदळवन क्षेत्राची पाहणी करण्यासाठी भेट दिली. त्यावेळी वनविभागाचे वनपाल अंधेरी, मंडळ अधिकारी, अंधेरी, परिरक्षक भूमापक वर्सोवा, तलाठी वर्सोवा इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सदर कांदळवन क्षेत्राच्या पाहणी दरम्यान असे निर्देशनास आले की, लोखंडवाला बॅक रोड पासुन पश्चिमेकडे जाणारा एक कच्चा रस्ता आहे. सदरचा कच्चा रस्ता लोखंडवाला तलाव किंवा गणपती विर्सजन तलावाच्या उत्तर बाजुने पश्चिमेकडे असलेल्या डंपींग ग्राऊंडकडे गेलेला आहे. सदर रस्त्याची लांबी लोखंडवाला बॅक रोड पासुन डंपींग ग्राऊंड पर्यंत सुमारे १ किलोमीटर इतकी आहे. सदर रस्ता कच्च्या स्वरुपाचा, मातीचा असुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस सलग असे लोखंडी अँगल व जाळीचे कुंपण केलेले आहे. सदर कुंपणाला पिवळा रंग देण्यात आलेला असुन सदरचे कुंपन मागील ३ ते ४ महिन्यापूर्वी तयार करण्यात आले आहे. सदर कुंपनाची उंची अंदाजे ८ फुट असुन कुंपन मजबूत आहे.

सदर कुंपनाच्या बाहेर व आत अर्थात रस्त्यावर काही ठिकाणी घाण कचरा, डेब्रीज व निरुपयोगी साहित्य वाहणात भरुन आणून टाकलेले दिसुन येते. डंपींग ग्राऊंड पर्यंत डेब्रीज भरलेले वाहन घेऊन जाता

(P.T.O)

रस्त्यावरच रिकामे करुन जाण्याची प्रवृत्ती यामागे दिसुन येते. सदर डेब्रीज रस्त्यावर टाकतांना त्यावरील कुंपनाला लगत टाकण्यात येतात असे दिसुन येते यामुळे लोखंडी कुंपनाला धोका निर्माण झालेला असुन काही दिवसात कुंपण कोसळून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर रस्त्यावर जाण्यासाठी लोखंडवाला बॅक रोडच्या कडेला अर्थात कुंपनाच्या शेवाळी दोन्ही बाजूस मोठे लोखंडी गेट बसविण्यात आलेले आहेत. मात्र सदर गेट जवळ देखील डेब्रीज टाकल्यामुळे गेटची खालची बाजू जमीनीत गाडली गेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी गेट असुनही ते उपयोगात नाही आणि त्यामुळे लोखंडवाला बॅक रोडवरुन सदरच्या जुन्या रस्त्यावर जाण्या येण्यासाठी कोणताही मज्जाव दिसुन येत नाही.

वरील रस्त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या कुंपनाच्या बाहेरील बाजूस कांदळवनाची मोठ मोठी झाडे आहेत सदरची कांदळवनाची झाडे काही ठिकाणी आहेत सदरची कांदळवनाची झाडे काही ठिकाणी वरील कुंपनाच्या बाहेरील बाजूस अगदी लगत उभी आहेत. वरील रस्ता हा अंदाजे १५ फुट रुंदीचा कांदळवन क्षेत्रातुन डंपिंग ग्राऊंड पर्यंत जाणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावर व रस्त्याच्या कडेला कुंपनावर डेब्रीज टाकुन रस्ता व कांदळवन क्षेत्र या दरम्यान असलेले कुंपन नष्ट करणे व त्यानंतर कांदळवन क्षेत्रात डेब्रीज नेऊन टाकणे, असा हेतू काही अज्ञात समाजकंटकांचा दिसुन येतो.

वरील प्रमाणे पंचनामा सकाळी ११.०० वाजता सुरु करुन ११.३० वाजता पूर्ण केला असे.

वरील प्रमाणे पंचनाम्यावर स्थानिक रहिवाशी व कामगार यांनी स्वाक्षरी करण्यास नकार दिला.

(पुढील पानावर)

त्यामुळे उपस्थित सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या हजेरीने सदरचा पंचनामा पूर्ण करण्यात येत आहे. सदर पंचनाम्याच्या वेळी भ्रमणध्वनी कॅमेराद्वारे वरील रस्ता व वस्तुस्थितीचे छायाचित्र काढण्यात आले आहे. तक्रारदार यांना उपस्थित राहणेबाबत पूर्व सुचना देऊनही त्या वरील स्थळपाहणीच्या वेळी उपस्थित राहिलेल्या नाहीत.

21/12/2019

१) (उमेश बिरारी)
उपविभागीय अधिकारी,
मुंबई पश्चिम उपनगर

21.12.19

२) (सचिन भालेराव)
तहसीलदार अंधेरी

21/12/2019

३) (प्रकाश देवरुखकर)
प.भू. वर्सोवा

४) (एच.आर. साठे)
कार्यपालक अंधेरी, म.न.पा.सं

21.12.19

५) (हेमंत परळीकर)
मंडळ अधिकारी अंधेरी

६) (गणेश लोंधर)
तलाठी वर्सोवा

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, 10 वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051
दूरध्वनी : 26556799 फॅक्स : 26556805 ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-2 आय/टे-8/कावि-1197/18
दिनांक :19/11/2018 - 5191

प्रति,
मुख्य अधिकारी,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई,
गृहनिर्माण भवन,कलानगर, बांद्रा पूर्व, मुंबई.

**विषय :- मौजे वर्सोवा ता.अंधेरी येथील स.नं.120अ या महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या जागेवरील कांदळवनाचा ऱ्हास करुन अतिक्रमण होत असलेबाबतत.**

**संदर्भ :- श्री. संतोष सोनावणे जनजागृती मानवकल्याण प्रतिष्ठाण यांचा अर्ज दि.20/10/2018**

महोदय,

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी श्री. संतोष सोनावणे जनजागृती मानवकल्याण प्रतिष्ठाण यांचा दिनांक20/10/2018 रोजीचा तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकरणी अर्जदार श्री. संतोष सोनावणे जनजागृती मानवकल्याण प्रतिष्ठाण यांनी मौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील एस व्ही पी नगर सर्वे नं.120अ याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास करुन अतिक्रमण होत असलेबाबत तक्रार दाखल केली आहे.

सदर प्रकरणी मौजे वर्सोवा ता.अंधेरी येथील स.नं.120अ या मिळकतीचे 7/12 व मिळकतपत्रीका पाहता आपले मंडळाच्या मालकीची नावे असल्याचे दिसून येते. त्या अनुषंगाने सदर प्रकरणी महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-2001/183/प्र.क्र.31/ता.क.1 दिनांक 25/10/2001 नुसार " कांदळवनाचे ( खारफुटी ) क्षेत्र (जमीन ) ज्या विभागाच्या अखत्यारित आहेत त्या विभागाने त्या क्षेत्रात कांदळवनाची अवैध कटाई/ ऱ्हास /नुकसान झाल्यास संबधित विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे कारवाई करणे त्या विभागाची जबाबदारी राहील " असे नमुद आहे.

तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. 3246/2005 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक 06/10/2006 रोजी दिलेल्या आदेशान्वये कांदळवनाचा ऱ्हास करणाऱ्या व्यक्ती वा संस्था यांचेविरुध्द कारवाई करण्याचे निर्देश दिले असून सदर जागेवर होणाऱ्या अतिक्रमणापासून संरक्षण होणेबाबत उपरोक्त नमूद मा. उच्च न्यायालयाचे आदेश आणि शासन परिपत्रकान्वये आपलेस्तरावरुन तात्काळ कार्यवाही करणेबाबत यापर्वी आपणास वारंवार कळविण्यात आले आहे.

सबब, प्रश्नांकीत मिळकत ही आपल्या मालकीची असुन सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर जागेवर होणाऱ्या अतिक्रमणापासून संरक्षण होणेबाबत



Scanned by CamScanner

उपरोक्त नमूद मा. उच्च न्यायालयाचे आदेश आणि शासन परिपत्रकान्वये आपलेस्तरावरुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त मिळकतीवरील अनधिकृत अतिक्रमण निष्कासित करुन सदर जागेवर कायमस्वरुपी संरक्षण कुंपण भिंत बांधणे अत्यंत आवश्यक आहे. तरी याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करुन या कार्यालयास अवगत करावे, ही विंनती.

(राजेंद्र बोरकर)
निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.

प्रत : श्री. संतोष सोनावणे जनजागृती मानवकल्याण प्रतिष्ठाण कार्या- 205, 2रा मजला, रायगड कमशियल कॉम्पलेक्स, टंडन गॅरेज समोर, जोगेश्वरी (प), मुंबई 102 यांना माहितीसाठी.

11/XII/18
② Issued.

Scanned by CamScanner